**नियमित दिवाणी दावा क्र १०९२/२०२१**
**निशाणी क्र ५५ पुढे सुरू**

**<u>प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्र. १</u>**

**नाव — अशोक चिंतन क्षिरसागर,**

**<u>उलटतपास वादीतर्फे ॲड. डी. एच. सराफ यांचेमार्फत —</u>**

२. मी प्रतिवादी यांना ओळखतो. प्रतिवादी क्र. १ व २ हे वादी मनिषा हिचे सासु व सासरे आहेत. प्रतिवादी क्र. ३ संकल्प हा गणेशचा मुलगा व वादीचा पुतण्या आहे. प्रतिवादी जनाबाई हि वादीची नणंद आहे. हे मला माहित नाही की, मनिषाचे पती १४.०४.२०२१ रोजी मयत झाले होते. मयत कमलाकर हा प्रतिवादी बब्रुवान व केशरबाई यांचा मुलगा आहे.

**३.** हे म्हणणे खरे नाही की, शिवली येथील गट नं. ४१८ ही जमीन वादी व प्रतिवादींचे वडीलोपार्जित जमीन आहे. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकत ही वादी व प्रतिवादी यांच्या एकत्र कुटूंबाची मिळकत आहे. हे म्हणणे खरे आहे की, मनिषाचे कमलाकरसोबत लग्न झाल्यानंतर ते उत्तर सोलापूर येथे काम धंद्याकरिता गेले होते. हे म्हणणे खरे नाही की, काम धंद्याकरिता उत्तर सोलापूर येथे राहत असल्यामुळे मनिषा व कमलाकर हे गावी ये—जा करित होते. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत ही सर्व वादी व प्रतिवादी कसत होते. हे म्हणणे खरे नाही की, जमीन मशागतीकरिता येणारा खर्च सर्वजन एकत्रीत करित होते. हे मला माहित नाही की, प्रतिवादी क्र. १ बब्रूवान हा मयत कमलाकर यास जमीनीमधील उत्पन्न देत असे. हे म्हणणे खरे आहे की, वादी व प्रतिवादी यांची दावा मिळकतीव्यतिरिक्त इतर जमीन नाही. हे म्हणणे खरे आहे की, दुसरी जमीन नसल्यामुळे दावा मिळकतीवर सर्वाचे कुटूंब चालते. हे मला माहित नाही की, प्रतिवादी हे वादीस दावा मिळकतीत येण्यास प्रतिबंध करत होते. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादीने वादीस गावात येण्यास प्रतिबंध करुन तिला उत्पन्न देखील देण्यास टाळत होते.

**४.** हे म्हणणे खरे आहे की, बब्रुवान याने संकल्प याला बक्षिसपत्र करुन दिले. हे मला माहित नाही की, सदर दस्ताचा क्र. <u>३४८९/२०२१</u> असा आहे. सदर बक्षिसपत्राआधारे दिलेल्या जमीनीवर वादी व प्रतिवादींचा हक्क नाही. संकल्प याला दिलेल्या जमीनीवर बब्रुवान याचा ताबा आहे. मी बक्षिस पत्रातीलमजकुर वाचलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये दावा मिळकतीबाबत वाटण्या झालेल्या नाहीत. हे मला माहित नाही की, वादीचे पती मयत झाल्यानंतर वादीने प्रतिवादींकडे दावा मिळकतीतील हिस्सा मागितला होता. हे मला माहित नाही की, प्रतिवादींनी वादीस दावा मिळकतीतील वाटणी देण्यास नकार दिला होता.

५. माझे शिक्षण १२ वी पर्यंत झाले आहे. मला लिहता वाचता येते. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी गणेश हा माझा जवळचा मित्र आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत

ही लिंबराज माधवराव वाघमारे व पुष्पाबाई ज्ञानदेव वाघमारे रा. मेंढा यांच्या मालकीची होती हि बाब मी खोटी सांगत आहे. दावा मिळकत प्रतिवादींनी खरेदी घेतली, त्यावेळेस मी लहाण होतो. परंतू मला माझया वडीलांकडून जमीन खरेदी घेतल्याचे समजले आहे. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकत ही प्रतिवादींनी घेतली तेव्हा मी सज्ञान नव्हतो, त्यामुळे सध्या प्रतिज्ञापत्रामध्ये मी प्रतिवादीच्या सांगण्यावरुन मजकुर नमुद केला आहे.

**६.** हे म्हणणे खरे नाही की, मी दावा मिळकतीचा शेतशेजारी नाही. दावा मिळकतीच्या पुर्व बाजुस माझी जमीन आहे. माझी जमीन दावा मिळकतीपासुन अर्धा किलोमिटर लांब आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी दावा मिळकतीमध्ये जात नाही. माझी मिळकत ही दावा मिळकतीच्या अलीकडे आहे. मला वादीचा स्वभाव कसा आहे हे माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी वादी व प्रतिवादीचा नातेवाईक नसल्यामुळे मला वादी व प्रतिवादीच्या कुटूंबात काय घडते हे माहित नाही.

**७.** हे म्हणणे खरे आहे की, मी बक्षीसपत्र करतेवेळी उपस्थीत नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृती**

**दि २१/०६/२०२५**

**श्री. आवटे पी. पी**
**सह दिवाणी न्यायाधीश व न्यायदंडाधिकारी, औसा.**

**नियमित दिवाणी दावा क्र १०९२/२०२१**
**निशाणी क्र ५६ पुढे सुरू**

**<u>प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्र. २</u>**

**नाव — सुरवसे मकरध्वज पांडूरंग,**

**<u>उलटतपास वादीतर्फे ॲड. डी. एच. सराफ यांचेमार्फत —</u>**

२. मी वादी व प्रतिवादी यांना ओळखतो. प्रतिवादी क्र. १ व २ हे वादी मनिषा हिचे सासु व सासरे आहेत. प्रतिवादी क्र. ३ संकल्प हा गणेशचा मुलगा व वादीचा पुतण्या आहे. प्रतिवादी जनाबाई हि वादीची नणंद आहे. हे मला माहित नाही की, मनिषाचे पती १४.०४.२०२१ रोजी मयत झाले होते. मयत कमलाकर हा प्रतिवादी बब्रुवान व केशरबाई यांचा मुलगा आहे.

३. हे म्हणणे खरे नाही की, शिवली येथील गट नं. ४१८ ही दावा जमीन वादी व प्रतिवादींचे वडीलोपार्जित जमीन आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत ही वादी व प्रतिवादी यांच्या एकत्र कुटूंबाची मिळकत आहे. हे मला माहित नाही की, मनिषाचे कमलाकरसोबत लग्न झाल्यानंतर ते कोंडी, उत्तर सोलापूर येथे काम धंद्याकरिता गेले होते. हे मला माहित नाही की, काम धंद्याकरिता उत्तर सोलापूर येथे राहत असल्यामुळे मनिषा व कमलाकर हे गावी ये—जा करित होते. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत ही सर्व वादी व प्रतिवादी कसत होते. हे मला माहित नाही की, जमीन मशागतीकरिता येणारा खर्च सर्वजन एकत्रीत करित होते. हे मला माहित नाही की, प्रतिवादी क्र. १ बब्रूवान हा मयत कमलाकर यास जमीनीमधील उत्पन्न देत असे. हे म्हणणे खरे आहे की, वादी व प्रतिवादी यांची दावा मिळकतीव्यतिरिक्त इतर जमीन नाही. हे मला माहित नाही की, दुसरी जमीन नसल्यामुळे दावा मिळकतीवर सर्वाचे कुटूंब चालते. हे मला माहित नाही की, प्रतिवादी हे वादीस दावा मिळकतीत येण्यास प्रतिबंध करत होते. हे मला माहित नाही की, प्रतिवादीने वादीस गावात येण्यास प्रतिबंध करुन तिला उत्पन्न देखील देण्यास टाळत होते.

४. हे म्हणणे खरे आहे की, बब्रुवान याने संकल्प याला बक्षिसपत्र करुन दिले. हे मला माहित नाही की, सदर बक्षिसपत्राचा दस्ताचा क्र. <u>३४८९/२०२१</u> असा आहे. हे म्हणणे खरे आहे की, वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये दावा मिळकतीबाबत वाटण्या झालेल्या नाहीत. हे मला माहित नाही की, वाटण्या न झाल्यामुळे सर्वाचे अविभक्त हिस्से दावा मिळकतीमध्ये आहेत. हे म्हणणे खरे नाही की, संकल्प सज्ञान नसल्यामुळे दावा मिळकत ही सर्वजन कसतात. हे मला माहित नाही की, बब्रूवान वयस्कर झाल्यामुळे तो स्वतः जमीनीची मशागत करित नाही. हे मला माहित नाही की, कमलाकर मयत झाल्यामुळे वादीला गावात येण्यास प्रतिवादी प्रतिबंध करतात तसेच दावा मिळकतीचे उत्पन्न देखील देत नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, वादीचे पती मयत झाल्यानंतर वादीने प्रतिवादींकडे दावा मिळकतीतील हिस्सा मागितला होता. हे मला माहित नाही की, प्रतिवादींनी वादीस दावा मिळकतीतील वाटणी देण्यास नकार दिला होता.

**५.** माझे शिक्षण १० वी पर्यंत झाले आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी गणेश हा माझा जवळचा मित्र आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी कारखान्यात वाचमॅन म्हणून कामास आहे. कारखाना ते माझे गाव सहा ते सात किलोमिटर आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी वाचमॅन असल्यामुळे कारखान्यावर राहतो. दावा मिळकत ही प्रतिवादीने वाघमारे यांचेकडून घेतली आहेत, परंतू मला त्यांची पुर्ण नावे सांगता येत नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीची खरेदी करण्यात आली तेव्हा मी अज्ञान होतो. हे म्हणणे खरे आहे की, मी लहाण असल्यामुळे मला खरेदीचा तपशील मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत ही प्रतिवादींनी घेतली तेव्हा मी सज्ञान नव्हतो, त्यामुळे सध्या प्रतिज्ञापत्रामध्ये मी प्रतिवादीच्या सांगण्यावरुन मजकुर नमुद केला आहे. हे म्हणणे खरे आहे की, जमीन खरेदीनंतर ती कोण कसत होते हे मला माहिती नाही.

**६.** हे म्हणणे खरे आहे की, मी दावा मिळकतीचा शेतशेजारी नाही. हे मला माहित नाही की, सद्या दावा मिळकतीची वहिवाट कोण करत आहे. प्रतिवादीचे व माझे नातेसंबंध आहेत. हे म्हणणे खरे आहे की, वादीच्या स्वभाव हट्टी असल्याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादी व प्रतिवादी हे एकत्र कुटूंबात राहतात. हे म्हणणे खरे आहे की, मी बक्षीसपत्र करतेवेळी उपस्थीत नव्हतो, त्यामुळे त्यातील मजकुर मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृती**

**दि २१/०६/२०२५**

**श्री. आवटे पी. पी**
**सह दिवाणी न्यायाधीश व न्यायदंडाधिकारी, औसा.**